Vol 3 Issue 11 Dec 2013

ISSN NO: 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-11, Dec-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील शाहीरांचे योगदान

देवीदास वायदंडे
विभाग प्रमुख इतिहास विभाग मु.सा काकडे महाविद्यालय, सोमश्वरनगर, पुणे

***सारांश:***भारतीय स्वातंज्यानंतर भाषिक राज्याची चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली. मराठी भाषिकांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहीली. कॉंग्रेस आणि पंतप्रधान नेहरू सरकार भांडवलशाहांशी हातमिळवणी करून महाराष्ट्राचा मुकुटमणी असलेली मुंबई गुजराथी वर्चस्वाखाली रहावी म्हणुन केंद्रातील सत्ताधारी सरकारने मराठी भाषिकांच्या मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला सरळ सरळ नकार दिला. या उलट गुजराथी आणि मराठी भाषिकांचे मिळुन द्विभाषिक राज्य बनविण्याचा घाट घातला. तेव्हा अवघी महाराष्ट्रातील जनता पेटुन उठली कारण हा लढा विचारांचा होता. मराठी अस्मितेचा होता. मराठी अभिमानाचा होता. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महाराष्ट्राच्या मनामनात पोहचली.

***प्रस्तावना:—***

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासाठी कॉंग्रेससह सर्वच पक्षांनी एकजुट दाखवून हा लढा सुरू केला पण काही काळाने महाराष्ट्र कॉंग्रेसने या लढयापासुन बाजुला होणेच पसंद केले. संयुक्त महाराष्ट्राच्या अंदोलनात सर्व पक्ष एकत्र येउन सत्ताधा-यांच्या विरोधात एकजुटीने लढले या शिवाय साहित्यिक, पत्रकार, पुढारी, यांच्यासह शाहिरांचे योगदान हे या लढयासाठी अत्यंत मौलिक ठरले.

शाहीर आण्णा भाऊसाठे, शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर जंगमस्वामी, शाहीर लिलाधर हेगडे, शाहीर फाटे, शाहीर चंदु भरडकर, शाहीर साबळे, शाहीर विठ्ठल उमप या सारख्या शाहीरांची एक मोठी फळीच या चळवळीत उभी राहीली या शाहीरांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महाराष्ट्राच्या घराघरात पोहचवली नव्हे तर या चळवळीला जन पाठींबा मिळवून ही चळवळ लोकचळवळ बनविण्याचे कार्य याच शाहीरांनी केले. या पैकी ज्या शाहीरांच्या कार्याचा प्रभाव दिर्घकाळ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत होता. ते शाहीर म्हणजे आण्णा भाऊसाठे, शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर हे होते.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी महाराष्ट्रभर सभा, मोर्चे, अंदोलने, सत्याग्रह, मेळावे सुरू झाले. महाराष्ट्रातील त्या काळातील साडे तीन कोटी मराठी जनतेच्या आकांक्षा एकीकडे आणि केंद्रातील कॉंग्रेस सरकारचा आग्रह दुसरीकडे असा हा संघर्ष पेटला होता. हिच मराठी जनतेच्या अस्मितेची वेळ होती.महाराष्ट्राच्या मराठी मातीचा, मराठी भाषेचा स्वाभिमान जागृत करण्याची ही वेळ होती हे जाणून शाहीर आण्णा भाऊसाठे, शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर, शाहीर आत्माराम पाटील यांच्या सारख्या शाहीरांनी आपल्या उत्तुंग प्रतिभेच्या जोरावर महाराष्ट्रातील अन्यायाविरूध्द अक्षरशः रान उठविले. मराठी मन चेताविले.

शाहीर आण्णा भाऊसाठे, शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर हे तीन शाहीर संयुक्त महाराष्ट्राच्या लढयातील त्रिशूळ होते असे वर्ण न डॉ. रोझा देशपांडे यांनी केले आहे. त्यांची शाहीर कवने, गाणी, पोवाडे ऐकुन मराठी मानुस पेटुन उठत असे. त्यांची स्फुर्ती घेउन शाहीर आत्माराम पाटील, शाहीर नामदेव कापडे, शाहीर चंदु भरडकर, शाहीर जैनु शेख, शाहीर इंद्रायणी पाटील यांनी संपुर्ण महाराष्ट्र दणाणून सोडला.

या लढयासाठी आण्णा भाऊंच्या प्रतिभेला बहर आला होता. त्यांनी या लढयासाठी अनेक तमाशे, लोकनाटये, पोवाडे, गीते, लावण्या लिहाल्या होत्या त्या शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर यांच्या सहाकार्याने स्थापन केलेल्या लाल बावटा कलापथकाच्या माध्यमातुन संपुर्ण महाराष्ट्रभर सादर करण्यात आले. आण्णा भाऊंचे पोवाडे इतके लोकप्रीय होते की, शाहीर गव्हाणकर यांनी डफावर थाप मारली तरी टाळयांचा गजर होत असे. शाहीर आण्णा भाऊंची बहुतेक गाणी, पोवाडे शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर हेच गात असत.

तमाशाचा वारसा आण्णा भाऊंकडे उपजतच होता. कम्युनिस्ट विचारांचा प्रभाव असल्यामुळे कामगार, कष्टकरी, शेतकरी आणि भांडवलदार यांचा संघर्ष त्यांनी तमाशाच्या, लोकनाटयाच्या रूपाने रेखाटला. आपल्या तमाशाच्या माध्यमातुन राज्कारण्यांवर आणि सरकारवर आपल्या लेखणीने फटकारे ओढले. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, लोकमंज्याचा दौरा, बेकायदेशीर, शेटजीचे इलेक्शन हे तमाशे विशेष गाजले. पण माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची ऋ हया तमाशाने संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाला एक नवी उर्जा दिली. आण्णा भाऊंनी १९४९ मध्ये भरलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या धुमाळीत हा तमाशा आणला होता.

भाषावार प्रांतरचनेच्या प्रक्रियेत मुंबई महाराष्ट्राला द्यावी की केदशासित करावी या विषयावर चर्चा सुरू झाली मुंबई, बेळगाव, कारवार, निपाणी, डांग उंबरगावसह संयुक्त महाराष्ट्र झालच पाहीजे! अशी घोषणा देऊन मराठी मानसाला मैदानात उतरावे लागले. पण्णीकर, कुंझरू राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल आल्यावरही मुंबई महाराष्ट्राला मिळण्याची चिन्हे दिसेनात. मुंबई महाराष्ट्राची कशी आहे हे अत्यत प्रभाविपणे जनसामान्यावर बिंबवण्यासाठी आण्णा भाऊंनी हे लोकनाटय लिहले मुनिमजी आणि विष्णु (कामगार) या दोघांच्या संवादातुन हा तमाशा साकारला आहे यात आण्णा भाऊ लिहतात,

मुनिमजी मुंबईच्या मागणीवर म्हणतात,

नाना भाषेची | अनंत जातीची |
तुच मागशी कशी हिला ?
विष्णु उत्तर देतो ः जशी गरूडाला पंख | आणि वाघाला नख |
तशी ही मराठी मुलखान ||
मुनिमजी ः आम्ही सोडून घरदार | हिचा वाढवाय व्यापार |
पैका पेरील का बोल ?
विष्ण ः नदीला बगळा | जमून सगळा |
टपून बसतो कशाला ?

अशा प्रकारच्या खटके बाज संवादातुन 'माझी मुंबई' आण्णा भाऊ महाराष्ट्राच्या मराठी मानसापुढे उभी केली. आण्णा भाऊंनी लिहालेली 'माझी मैना गावावर राहीली ' ही लावणी म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा मानबिंदूच होता. या लावणीने तमाम महाराष्ट्रातील मराठी जनतेला अक्षरशः वेड लावले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा मुंबईतील कामगार हा कणाच होता.या लावणीत संयुक्त महाराष्ट्राचा मुंबईचा इतिहास सांगुन कामगार क्रांतीचा एल्गारच आण्णा भाऊंनी भरला आहे.

माझी मैना गावावर राहीली |
माझ्या जीवाची होतीया काहिली ||
ओतीव बांधा | रंग गव्हाळा | कोर चंद्राची | उदात्त गुणाची |
मोठया मनाची सीमा ती माझी रामाची |......
पाण्यान भरल खिस माझ | वाण मला एका छत्रीची
त्याच दरम्यान चळवळ उठली संयुक्त महाराष्ट्राची | बेळगाव कारवार निपानि
गोव्यासह एक द्विभाषिक राज्याची | चकाकली संगिम अन्यायाची |
फौज उठली विनिवरची कामगरांची | शेतक-यांची मध्यमवर्गीयांची |
उठला मराठी देश | आला मैदानी त्वेश | वैरी करण्या नामशेष |
गोळी डगमगली छातीवर साहीली | माझ्या जीवाची ......

अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आपल्या लावणीत आण्णा भाऊंनी शब्द बध्द केली आहे. कामगार शेतकरी मध्यमवर्ग यांना पाठ भिंतीला लावून जनू लढण्याची प्रेरणाच सवंध महाराष्ट्राला दिली आहे. ही लावणी शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी महाराष्ट्राच्या घराघरात पोहाचली.

आण्णा भाऊप्रमाणेच शाहीर अमर शेख यांचे या चळवळीत योगदान अत्यंत महत्वाचे आहे. शाहीर अमर शेख ही आपल्या पहाडी आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असत. साम्यवादी क्रांतीचे संस्कार घेऊनच या क्रांतीसाठी अमर शेख सज्ज झाले होते. याच संस्कारातुन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान महात्वपुर्णपणे अमर शेख यांनी दिले. शाहीर आण्णा भाऊंची जोशपुर्ण शाहीरी अमर शेख तेवढयाच त्वेषाने गात होते. डॉ.सुधीर फडके यांनी लिहलेले 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे गीत अमर शेखांनी आपल्या पहाडी आवाजाने लोकप्रिय केले.

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने २७ जुलै १९५६ रोजी मोर्चा काढला होता. दिल्लीच्या संसद भवनावर मराठी जनतेने मोर्चा काढला या मोर्चात अमर शेख एका तुकडीचे नेतृत्व करीत होते.त्यांच्या पहाडी आणि प्रभावी आवाजाने दिल्लीकरांनाही मंत्रमुग्ध केले. अमर शेखांच्या आवाजाने दिल्लीचे संपुर्ण रस्ते दणानुन गेले. दिल्लीतील स्त्रिया पुरूष अवला वृध्द अक्षरशः दारे खिडक्या उघडुन हे दृष्य पाहत होते. या मोर्चात अमर शेख यांच्या आवाजातील प्रचंड प्रभावी गीत ठरले ते म्हणजे.........

जागा मराठा आम, जमाना बदलेगा |
उठा है तुफान वह आखिर | बंबई लेकर दम लेगा ||

या संबधी आचार्य अत्रे लिहतात, 'आकाशात जोपर्यंत सुर्य व चंद्र प्रकाशात आहेत तोपर्यंत मुंबई बेळगावसह महाराष्ट्र तुम्हाला मिळणार नाही'. असे आजचे उन्मत राज्यकर्ते तीन कोटी मराठी जनतेला आहवान देत असताना भारताच्या राजधानी मध्ये जाऊन 'जगा मराठा आम जमाना बदलेगा!'. असे छाती फाडुन अमर शेख यांनी जो टाहो फोडला तो काय महान ध्येयाची प्रेरणा त्याच्या रोमा रोमात संचारली असल्याखेरीज काय ऋ यावरून अमर शेख यांच्या आवाजाची आणि त्यांच्या योगदानाची प्रचिती येते.

कम्युनिस्ट पक्षाची सभा असो वा संयुक्त महाराष्ट्र चळवळीची अमर शेखच्या उपस्थिती शिवाय ती सुरूच होत नव्हती. शाहीर अमर शेख उभे राहीले की 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहीजे !' अशा घोषणा होत असत. सभेच्या सुरवातीचे वाक्य म्हणजे घनघोर लढाईच असे. यांच्या एकजुटीचे गाणे प्रचंड गाजले होते.

शेतक-यांनो यारे, घ्या एकीची हाती मशाल |
कामगार या सारे उधळा वरती रक्त गुलाल ||

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे एक अमर शेख यांचे गाणे महाराष्ट्रास प्रेरणादायी ठरले. ते गाणे अनेकांच्या मुखी होते. ते संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची प्रेरणाच होती. ते गीत आहे......

जय महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्राच्या गाऊगाना |
गाउ उंचावुनी माना | घेऊतानावर ताना ||

या शिवाय अनेक कवने, गीते, पोवाडे गाउन अमर शेख यांनी संयुक्त महाराष्ट्र गाजविल नव्हे तर महाराष्ट्रातील हजारो जनतेला संयुक्त महाराष्ट्राच्या संग्रामात सामील कारून घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या शाहीरीने महाराष्ट्रास दाखविले.

शाहीर आण्णा भाऊसाठे, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या शिवाय शाहीर आत्माराम पाटील हे एक प्रभावी शाहीर होते. शाहीर पाटील यांनी संयुक्त महाराष्ट्राचा गोंधळ लिहाला व तो संपुर्ण महाराष्ट्रास सादर केला गेला. महाराष्ट्राच्या विरोधकांनी महाराष्ट्रावर द्विभाषिक लादले. दिल्ली सरकारने त्याचे गोडवे गायले आणि त्याचे समर्थन सुरू केले. परंतु मराठी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र हवा होता. त्यासाठी शाहीर आत्माराम पाटील यांनी संयुक्त महाराष्ट्राचा गोंधळ लिहला. पा गोंधळात एक प्रभावी कवन होते ते म्हणजे......

संयुक्त महाराष्ट्र उगवतोय माझ्या सरकारा |
खुशाल कोंबड झाकुन धरा ||

संपुर्ण महाराष्ट्रात हा गोंधळ गाजला यात अनेकदा शाहीर आण्णा भाऊसाठे, शाहीर अमर शेख, व शाहीर गव्हाणकर यांनी ही काम केले होते.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील संयुक्त महाराष्ट्राचा हा सर्व व्यापी होता. हा लढा खेडया पाडयातुन तळा गाळा पर्यत पसरलेला होता. मराठी भाषिकांच्या हक्कासाठी अन्य भाषिकांचा द्वेश न करता हा लढा तीव्रतेने लढविला गेला आणि त्यात सुमारे पंचावन्न हजार लोक तुरूंगात गेले. एव्हडेच नव्हे तर एकशे पाच हुतात्यांना आपला प्राण मातृभूमीच्या मराठी अस्मितेसाठी गमवावा लागला. हा लढा मराठी मानसाच्या अस्मितेचा लढा होता. मराठी भाषिकांची अस्मिता, त्यांचा स्वाभिमान जागृत करण्याचे कार्यच शाहिरांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातुन केले होते. कारण शाहीरी ही त्या काळातील लोक जागृतीचे प्रभावी साधन होते.

शाहिरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस जे योगदान दिले ते बहुमोल होते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हा केवळ इतिहास नव्हे तर वर्तमान आहे. कारण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला तरीही अद्याप बेळगाव कारवारचा प्रश्न धुमसतो आहे.शेतकरी कामगार यांचे स्फुल्लींग चेतवण्याचे शाहिरांचे कार्य आजच्या वर्तमान आणि उद्याच्या भविष्यातही मोलाचे ठरणार आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१ . डांगळे अर्जुन (संपादक)आण्णा भाउ साठे निवडक वाङःमय, २००६
२ . पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङःमयगृह, मुंबई २०१०
३ . साठे आण्णा भाऊ (शाहीर) नवे तमाशे, अभिनव प्रकाशन, मुंबई १९५१
४ . साठे आण्णा भाऊ (शाहीर) आण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या, लोकवाङःमयगृह, मुंबई तृ . आ . २०१०
५ . गुरव बाबुराव आण्णा भाऊसाठे सामाजिक विचार आणि साहित्य विवेचन, लोकवाङःमयगृह, मुंबई १९९९
६ . गर्जा महाराष्ट्र शाहीर अमर शेख अध्यासन, मुंबई विद्यापिठ प्रकाशन, मुंबई, २००९
७ . ओव्होळ प्रभाकर ऐका शाहिराची कथा, मनोविकास प्रकाशन, पुणे २०१०
८ . नदाफ अजीज शाहीर अमर शेख, दिग्ताज प्रकाशन, पुणे २००५
९ . अत्रे आचार्य क-हेचे पाणी, खंड प्रवा, परचूरे प्रकाशन, मुंबई १९६८

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net